महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८३ /२०२४ दि. १२/०४/२०२४

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी**, कल्याण – डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात तसेच १) कल्याण वाहतूक उप विभाग २) कोळसेवाडी वाहतूक उप विभाग ३) डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक १४/०४/२०२४ रोजी **'डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती'** निमित्त मोठया प्रमाणात मिरवणूका निघणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण फाटा (मुंब्रा वाहतूक उप विभाग) येथून कल्याणचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना जड अवजड वाहनांना **कल्याणफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कल्याण फाटा (मुंब्रा वाहतूक उप विभाग) येथून मुंब्रा बायपास रोड – खारेगांव – मुंबई नाशिक महामार्गाने पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) नाशिक मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०८ वरून रांजनोली बायपास (कोनगांव वाहतूक उप विभाग) येथून कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **दुर्गाडी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदची वाहने दिनांक १४/०४/२०२४ रोजी रात्रौ २४:०० वा. नंतर इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) बदलापूर अंबरनाथ रोड, नेवळी नाका (विठ्ठलवाडी वाहतूक उप विभाग) येथून कोळसेवाडी पोलीस वाहतूक उप विभाग हद्दीत येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **नेवाळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने नेवाळी नाका येथून बदलापूर अंबरनाथ रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) नवी मुंबई कडून तळोजा बायपास मार्गे खोणी निसर्ग ढाबा कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना खोणी निसर्ग ढाबा येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने खोणी निसर्ग ढाबा येथून बदलापूर अंबरनाथ व काटई/बदलापूर चौक – लोढा पलावा – कल्याण फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना दि. १४/०४/२०२४ रोजी १२:०० ते २४:०० वाजेपावेतो मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर .

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.

मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका.

विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, कल्याण.

नियंत्रण कक्ष, ठाणे शहर.

<u>प्रत</u> :– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.</u>

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– सपोआ–कल्याण व भिवंडी श.वा.शा.

प्रभारी अधिकारी, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली, कोनगाव, भिवंडी वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.

CamScanner